ठाणे जिल्ह्यात सोमवारपासून उपाहारगृहे बेमुदत बंद

वेळ वाढवून न दिल्याने मालकांचा निर्णय

लोकसत्ता प्रतिनिधी

ठाणे : राज्य शासनाच्या निर्देशानुसार ठाणे जिल्ह्यात निर्बंध शिथिल करताना जिल्हा प्रशासनाने उपाहारगृहांना वाढीव वेळांचा दिलासा दिलेला नसून यामुळे संतापलेल्या उपाहारगृह व्यावसायिकांच्या संघटनेने येत्या सोमवारपासून संपूर्ण जिल्ह्यात घरपोच सुविधेसह उपाहारगृहे बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

उपाहारगृहांना भाजीपाल्याचा पुरवठा होऊ नये आणि ऑनलाईन सुविधेद्वारे उपाहारगृहातून नागरिकांना खाद्य पुरवठा करणाऱ्या कंपन्यांनी काम बंद ठेवावे, यासाठी संघटनेने आतापासून प्रयत्न सुरु केले आहेत. उपहार संघटनेने घेतलेल्या निर्णयाचा फटका उपाहारगृहांच्या खानावळीवर अवलंबून असलेल्या नागरिकांना बसणार असून यामुळे अनेकांचे हाल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

राज्य शासनाच्या निर्देशानुसार ठाण्याचे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांनी नवा आदेश काढून जिल्ह्यातील काही निर्बंध शिथिल केले. त्यामध्ये अत्यावश्यक सेवेसह इतर दुकानांच्या वेळा वाढविण्यात आल्याने व्यापाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. असे असले तरी उपाहारगृहांना कोणताही दिलासा देण्यात आलेला नसल्यामुळे या व्यावसायिकांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे. यापुर्वी जिल्ह्यात सोमवार ते शुक्रवार या दिवशी दुपारी ४ वाजेपर्यंत उपाहारगृहे सुरु ठेवण्यास आणि त्यानंतर घरपोच सेवेस परवानगी होती. हे निर्बंध नव्या आदेशामध्ये जशेच्या तसे लागू करण्यात आले असून केवळ शनिवार हा एकच दिवस त्यांना वाढवून दिला आहे. या एका दिवसाने व्यवसायामध्ये फार काही फरक पडणार नसल्याचे व्यावसायिकांचे म्हणणे आहे. निर्बंध शिथिल करताना उपाहारगृहांना इतर दुकाने आणि आस्थापनाप्रमाणेच वेळा वाढवून दिल्या जातील, अशी आशा उपहारगृह व्यावसायिकांना होती. परंतु नव्या आदेशात तसे काहीच झालेले नसल्यामुळे हे व्यावसायिक संतापले आहेत. यातूनच ठाणे शहरात गुरुवारी मुक मोर्चा काढण्याचे उपहारगृह व्यावसायिकांच्या संघटनेने जाहीर केले होते. अशा प्रकारचे मोर्चे काढून काहीच होणार नसल्याचा सूर काही व्यावसायिकांनी लावला होता. त्यामुळे संघटनेने अचानक मूक मोर्चा रद्द करण्याचा निर्णय रात्री घेतला. त्यानंतर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी चर्चा सुरू केली. या चर्चेअंती येत्या सोमवारपासून जिल्ह्यात उपाहारगृहे बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

> येत्या सोमवारपासून संपूर्ण ठाणे जिल्ह्यात घरपोच सुविधेसह उपाहारगृहे बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. सोमवारनंतर जिल्ह्यात एकही उपाहारगृह सुरु होणार नाही. त्यासाठी उपाहारगृहांना भाजीपाला पुरवठा करु नका, अशा सूचना संघटनेने पुरवठादारांना देण्यास सुरुवात केली आहे. त्याचबरोबर ऑनलाईन सुविधेद्वारे उपाहारगृहातून नागरिकांना खाद्य पुरवठा करणाऱ्या झोमॅटा कंपनीलाही पत्र दिले असून त्यांनाही काम बंद ठेवण्याची विनंती केली आहे.
>
> – **रत्नाकर शेट्टी**, सल्लागार, ठाणे हॉटेल ओनर असोशिएशन

महिला रेल्वे डब्यात सायंकाळी ७ पासून पोलीस तैनात

मुंबई: लोकल रेल्वे मधील महिला डब्यातील आधीच्या सुरक्षा वेळेत व ठिकाणे कायम ठेवून त्यात आणखी काही सुरक्षा उपायांचा समावेश केला आहे. सायंकाळी ७ पासून उपनगरीय रेल्वेच्या मधल्या स्थानकातून अप व डाऊन मार्गावर धावणाऱ्या लोकलच्या महिला डब्यातील प्रवाशांची कमी होणारी संख्या पाहता लोहमार्ग पोलीस तैनात करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याची प्रायोगिक तत्वावर अंमलबजावणी सुरू असल्याची माहिती लोहमार्ग पोलिसांनी दिली.

मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गावरून करोनाच्या आधी दिवसाला ७५ ते ८० लाखांपर्यंत प्रवासी प्रवास करत होते. यात महिलांची संख्या १५ ते २० टक्के होती. आता अत्यावश्यक सेवा कर्मचाऱ्यांनाच लोकल प्रवास असला तरीही दिवसाला एकूण २० ते २५ लाखांपर्यंत प्रवासी प्रवास करतात. यात महिला प्रवाशांचे प्रमाणही बरेच असते. तीन महिला डब्यांत आता संध्याकाळी ७ पासून पोलीस तैनात असेल.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे सूतोवाच, व्यापाऱ्यांना संयम बाळगण्याचे आवाहन

रेल्वेप्रवासाबाबत लवकरच निर्णय

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : मुंबईतील उपनगरी रेल्वेतून प्रवासाला परवानगी नसल्याने लोकांमध्ये असंतोष वाढत असतानाच उपनगरी रेल्वे प्रवासाला परवानगी देण्याबाबत जबाबदारीचे भान ठेवून निर्णय घेणार असून लवकरच त्याबाबत राज्यातील जनतेशी संवाद साधणार असल्याचे संकेत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी दिले. तसेच आंदोलनाचा पवित्रा घेणाऱ्या व्यापाऱ्यांनाही संयम बाळगण्याचे आवाहन त्यांनी केले.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'एच पश्चिम' विभागाच्या नवीन वास्तूच्या लोकार्पण प्रसंगी मुख्यमंत्री ठाकरे बोलत होते. राज्य सरकारने दुकानांच्या वेळा, कार्यालयांतील उपस्थिती याबाबत निर्बंध शिथील केले. पण कर्मचाऱ्यांना उपनगरी रेल्वेतून प्रवासाची परवानगी नसल्याने नाराजी वाढत आहे. विरोधी पक्षांनीही लोकांमधील असंतोष संघटित करण्यासाठी त्यावरून आंदोलनाचा इशारा दिला आहे. तशात गुरुवारी सकाळी उच्च न्यायालयानेही उपनगरी रेल्वेतून प्रवास बंदी व लांब पल्ल्याच्या गाड्या, बसमधून होणारी गर्दी या विसंगतीवर बोट ठेवत महाविकास आघाडी सरकारचे कान टोचले. या पार्श्वभूमीवर उपनगरी रेल्वेतून प्रवासाबाबत लवकरच निर्णय जाहीर करण्याचे संकेत उद्धव ठाकरे यांनी दिले.

उपनगरी रेल्वेतून प्रवासाची कधी परवानगी मिळणार असा सवाल केला जातो. त्याबाबतही विचार सुरू आहे. ज्या पद्धतीने आपण दुकानांना शिथिलता दिली. त्याचप्रमाणे उपनगरी रेल्वे प्रवासाच्या परवानगीचा निर्णयही जबाबदारीचे भान ठेवूनच घेणार आहोत. त्यासंदर्भात मी लवकरच तुमच्याशी संवाद साधेन, असे मुख्यंमत्री उद्धव ठाकरे म्हणाले. मुंबई आणि महाराष्ट्रात करोनाची परिस्थिती संमिश्र स्वरूपाची आहे. काही ठिकाणी बऱ्यापैकी सुधारली आहे.

तर काही ठिकाणी चिंताजनक नसली तरी चिंता करावी लागू नये याची खबरदारी घेण्यासारखी आहे. जिथे शिथिलता देऊ शकतो तिथे दिली आहे. जिथे देऊ शकलो नाही, तिथे नाईलाज आहे. पण याचा अर्थ हे बंद म्हणजे कायमच बंदच असा अर्थ नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नियम तोडू नका व संयम सोडू नका, असे आवाहन निर्बंध शिथिल न झालेल्या जिल्ह्यातील व्यापाऱ्यांना मुख्यमंत्र्यांनी केले. कुणी आमचे शत्रू आहेत आणि कुणी आमचे लाडके आहेत असे काहीही नाही. सगळ्या नागरिकांच्या जिवाची काळजी घेऊनच निर्णय घ्यावे लागतात, असे स्पष्टीकरण त्यांनी दिले.

'बीजिंग महापालिकेत तर शिवसेनेची सत्ता नाही'

मुंबईतील पूरस्थितीला महापालिकेतील सत्ताधारी शिवसेना जबाबदार असल्याच्या भाजप नेत्यांच्या टीकेचाही मुख्यमंत्र्यांनी समाचार घेतला. मुंबईवर नैसर्गिक आपत्ती येतच आहेत. सध्या एक नवीन संकट आहे. काही दिवसांचा, काही महिन्यांचा पाऊस काही तासांत पडत आहे. पूरस्थिती केवळ मुंबईतच नव्हे तर जगभर निर्माण होत आहे. बीजिंग किंवा जगभरात ज्या शहरांत पूर तेथील महापालिका काही शिवसेनेच्या ताब्यात नाही. पण तिथेही पूर आले. आता त्याला जबाबदार कोण? हे तिथे कोण असतील ते बोलत असतील,' असा टोला मुख्यमंत्री ठाकरे यांनी लगावला.

मुंबईत करोनाचे ३२४ नवे रुग्ण

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : मुंबईतील दैनंदिन रुग्णसंख्या मंगळवारी तीनशेहून कमी झाल्यानंतर गेल्या दोन दिवसात पुन्हा तीनशेहून अधिक रुग्णांची नोंद होऊ लागली आहे.

मुंबईत गुरुवारी ३२४ रुग्णांची नोंद झाली तर मृतांची संख्याही वाढली. दिवसभरात नऊ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. मुंबईतील परिस्थितीत हळूहळू नियंत्रणात येत असली तरी रुग्णांच्या संख्येत चढउतार सुरू आहे.

गुरुवारी ३२४ नवीन रुग्णांची नोंद झाल्यामुळे एकूण बाधितांची संख्या सात लाख ३६ हजारांपुढे गेली आहे. एका दिवसात ३१५ रुग्ण बरे झाल्यामुळे आतापर्यंत सात लाखाहून अधिक म्हणजेच ९७ टक्के रुग्ण करोनामुक्त झाले आहेत. त्यामुळे उपचाराधीन रुग्णांची संख्याही घटली असून सध्या ४,५२९ रुग्ण उपचाराधीन आहेत. बुधवारी ३४ हजार १४५ चाचण्या करण्यात आल्या होत्या. आतापर्यंत ८३ लाखांहून अधिक चाचण्या करण्यात आल्या आहेत. मुंबईतील रुग्णवाढीचा दर ०.०४ टक्क्यांपर्यंत खाली आला असून रुग्ण दुपटीचा कालावधीही १,५९१ दिवसांवर गेला आहे.

पोटांच्या तक्रारींवर स्वात्रीशीर इलाज
शुध्द केसर युक्त
१९२४ पासुन
राजबिंदु
RAJBINDU MRP 10ml.₹ 35=00. 30ml.₹ 75=00. 60ml.₹ 115=00. & 100ml.₹ 140=00.
पित्त | गॅस | जुलाब | उलट्या
उत्पादक वल्लभ विजय ॲन्ड सन्स
मुंबई-४०० ०६०.
Customer Care No. 9725608007



We regret to inform you that
DR NARAYAN KISANLAL MALPANI
passed away peacefully in his sleep on the 5th of August, 2021.
He lived a full and happy life of 90 years.
Fondly remembered by
Dr Aniruddha and Dr Anjali Malpani
Ambarish and Uma Malpani, Natasha and Pratik Oswal, Sanjna Malpani
Megha Malpani, V V Gondhalekhar
We hope to carry on his legacy of love and philanthropy.
No condolences, please.

...अन्यथा पालिका बरखास्तीचे आदेश देऊ

बेकायदा बांधकामप्रकरणी न्यायालयाने वसई-विरार पालिकेला खडसावले

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : दहा वर्षापूर्वीच अस्तित्वात आलेल्या वसई-विरार पालिकेच्या हद्दीत नऊ हजारांहून अधिक बेकायदा बांधकामे उभी राहिल्याची वसई-विरार पालिकेने गुरुवारी उच्च न्यायालयात कबुली दिली. त्यावर बांधकामे उभी राहत असताना त्याकडे दुर्लक्ष केल्यावरून न्यायालयाने पालिकेला धारेवर धरले. एवढेच नव्हे, तर पालिकेच्या डोळ्यादेखत बेकायदा बांधकामे उभी राहत असतील आणि त्यावर कारवाई करण्यास पालिका असमर्थ असेल तर पालिका बरखास्त करू व राज्य सरकारला प्रशासकामार्फत कारभार चालवायला सांगू, अशा शब्दांत न्यायालयाने पालिकेच्या भूमिकेचा समाचार घेतला.

त्याचवेळी या बांधकामावर कशी कारवाई करणार हे दोन आठवड्यांत स्पष्ट करण्याचे आदेश न्यायालयाने सध्या निवडणुकांअभावी पालिकेवर प्रशासक म्हणून नेमण्यात आलेल्या आयुक्तांना दिले. टेरेन्स हेंड्रिक्स यांनी केलेल्या जनहित याचिकेवरील सुनावणीच्या वेळी पालिकेने बेकायदा बांधकामे झाल्याची कबुली दिल्यावर मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांच्या खंडपीठाने पालिकेच्या कारभारावर ताशेरे ओढले. काही वर्षांपासून विशेषतः टाळेबंदीच्या काळात पालिका हद्दीत मोठ्या प्रमाणात बेकायदा बांधकामे उभी राहिल्याचे याचिकाकर्त्यांनी न्यायालयाला सांगितले. तसेच पालिका नऊ हजार बेकायदा बांधकामे उभी राहिल्याचा दावा करत असली तरी प्रत्यक्षात ही संख्या १२ हजारांहून अधिक असल्याचेही याचिकाकर्त्यांनी न्यायालयाला सांगितले.

TATA
टाटा पॉवर
दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, मुंबई-४०० ००१.
टेलि.: ९१ २२ ६६६५ ८२८२ **फॅक्स :** ९१ २२ ६६६५ ८८०१
सीआयएन : एल२८९२०एमएच१९१९पीएलसी०००५६७
ईमेल : tatapower@tatapower.com **वेबसाइट :** www.tatapower.com

अभिलेख तारखेची सूचना

कंपन्या अधिनियम, २०१३ च्या कलम ९१ च्या अनुसार याद्वारा सूचना देण्यात येते की, खालील प्रदानाच्या प्रयोजनार्थ अभिलेख तारीख म्हणून बुधवार, ०१ सप्टेंबर २०२१ निश्‍चित करण्यात आली आहे :
१. १,६०० - ९.१५% सुरक्षित विमोचनीय अपरिवर्तनीय ऋणपत्रे (सीरिज "के" ते "ओ") एकूण रु ५,६२,५०० प्रत्येकी यावरील वार्षिक व्याज आणि
२. या ऋणपत्रांच्या (आयएनई२४५ए०७३७४), एकूण रु. १६,००,००,००० च्या सीरिज "के"ची विमोचन प्रक्रिया.
दोन्हीकरिता १७ सप्टेंबर २०२१ ही नियत तारीख आहे.

दि टाटा पॉवर कंपनी लिमिटेड करिता
एच.एम. मिस्त्री
कंपनी सचिव
स्थळ : **मुंबई**
दिनांकित : **०५ ऑगस्ट २०२१**
(एफसीएस : ३६०६)

कर्ज वसुली न्यायाधिकरण
अर्थ मंत्रालय, वित्त सेवा विभाग, भारत सरकार
२रा मजला, भिकूभाई चेम्बर्स, कोचराब आश्रमाजवळ, एलिसब्रिज, पालडी, अहमदाबाद-३८० ००६.

अर्ज क्र. २२ (पूर्वीचा ६२) [डीआरटी नियमावली, २०१५ नियम ३७(१)]
[आय कर कायदा, १९६१ मधील दुसऱ्या अनुसूचीमधील नियम ५२(१) पाहा]

ई-लिलाव/विक्री सूचना
रजि. एडी/दस्ती/साक्षांकन/बिट ऑफ ड्रम

बँकेला देय असलेल्या आणि वित्तीय संस्था कायदा, १९९३ सह वाचल्या जाणाऱ्या आय कर कायदा, १९६१च्या दुसऱ्या अनुसूचीमधील नियम ३८, ५२(२) अंतर्गत विक्रीची घोषणा

आर.सी. क्र. १२०/२०१३ **ओ.ए. क्र. १३९/२०१०**

प्रमाणपत्रधारक : भारतीय स्टेट बँक आणि एएनआर
वि.
प्रमाणपत्र ऋणको : मे. शाश्वत इन्टरनॅशनल लिमिटेड आणि अन्य
प्रति,
सीडी क्र. ४ : ओरिएण्ड एक्स्पोर्ट्स लिमिटेड, १, कमर्शियल एरिया II एफ १, सिव्हिल टाऊनशिप, रौरकेला, ओडिशा-७६९ ००७.

खाली नमूद करण्यात आलेल्या मालमत्तेची माननीय पीठासीन अधिकारी, डीआरटी-I यांच्याद्वारे पारित करण्यात आलेल्या वसुली प्रमाणपत्रानुसार **मे. शाश्वत इन्टरनॅशनल लिमिटेड आणि अन्य यांच्याकडून रु.: २०,३२,३९,१३४.८९/- (रुपये वीस कोटी बत्तीस लक्ष एकोणचाळीस हजार एकशे चौतीस आणि एकोणनव्वद पैसे मात्र) (डिक्री रक्कम)** अधिक व्याज आणि शुल्काच्या रकमेच्या वसुलीसाठी (जर काही पूर्वी वसूल करण्यात आली असल्यास वजा करून) **जाहीर ई-लिलाव विक्रीद्वारे १७ सप्टेंबर, २०२१** रोजी करण्यात येणार आहे.

लॉट क्र.	सहकर्जदाराच्या नावासह जिथे कसूरदार हे मालमत्तेचे मालक आहेत आणि अन्य कोणीही व्यक्ती सह-मालक म्हणून त्यांच्या नावासह मालमत्तेचे वर्णन	राखीव मूल्य ज्याच्या खाली मालमत्तेची विक्री केली जाणार नाही (रु.मध्ये)	राखीव मूल्याच्या १०% किंवा राऊण्ड ऑफ (रु.मध्ये)
१	लाहोप गावदेवी मंदिरासमोर आणि सारवोली खारपाडा रोडच्या सी लिंकर प्रा. लि.जवळ, गाव लाहोप, जिल्हा रायगड, राज्य महाराष्ट्र येथे वसलेल्या गाव लाहोपच्या बिगर शेतजमिनीचा धारण केलेला सर्व्हे क्र. ४४/१/बी, ४४/३, ४६/१ आणि ४५.	११,००,००,०००/-	१,१०,००,०००/-

वरील मालमत्तेसाठी

[illegible]

(अलोक कुमार दीक्षित)
वसुली अधिकारी-I

'एनआयए'ला आरोपपत्रासाठी एक महिन्याची मुदतवाढ

हिरेन हत्या प्रकरण : सचिन वाझेंना जामीन नाकारला

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : प्रसिद्ध उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या अँटालिया या बंगल्याबाहेरील स्फोटके प्रकरण आणि व्यावसायिक मनसुख हिरेन हत्याप्रकरणी विशेष न्यायालयाने गुरुवारी राष्ट्रीय तपास यंत्रणेला (एनआयए) आरोपपत्र दाखल करण्यासाठी आणखी एक महिन्याची मुदत दिली. त्याचवेळी आरोपपत्र दाखल करण्यात आले नसल्याच्या कारणास्तव जामिनाची मागणी करणारा बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे यांचा जामीन न्यायालयाने फेटाळला.

हिरेन यांच्या हत्येसाठी आरोपींना ४५ लाख रुपये देण्यात आल्याचे उघड झाले आहे. मात्र हे पैसे कोणी दिले शोधायचे असल्याचा दावा करत एनआयएने आरोपपत्र दाखल करण्यासाठी ३० दिवसांच्या मुदतवाढीची मागणी केली होती. तर आरोपपत्र दाखल केले नाही म्हणून वाझेंनी जामिनासाठी अर्ज केला होता. या दोन्हींवर विशेष न्यायालयाने गुरुवारी निर्णय देताना एनआयएची आरोपपत्र दाखल करण्यासाठी एक महिन्याची मुदतवाढ देण्याची मागणी मान्य केली. तर आरोपपत्र दाखल करण्यासाठीची कायद्याने नमूद केलेली ९० दिवसांची मुदत संपण्याआधी आरोपपत्र दाखल केले नाही म्हणून जामीन देता येणार नाही, असे नमूद करत न्यायालयाने वाझेंचा जामीन अर्ज नाकारला.

वाझेंचा अर्ज हा गुणवत्तेवर आधारित नाही आणि या अर्जावर सुनावणी घेऊन न्यायालयाचा वेळ वाया गेला आहे, असे न्यायालयाने वाझेंचा अर्ज फेटाळाना नमूद केले.

सचिन वाझे यांनी दूरचित्रसंवाद माध्यमाद्वारे तळोजा कारागृहातून स्वतः; युक्तीवाद केला.

TATA
TATA STEEL LIMITED
Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001, India
Tel.: +91 22 6665 8282 Email: cosec@tatasteel.com
Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

सूचना

टाटा स्टील लिमिटेड ("कंपनी") संचालक मंडळाची सभा ही ३० जून, २०२१ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता कंपनीचा लेखापरिक्षित अलिप्त आणि अलेखापरिक्षित एकत्रित वित्तीय निष्कर्ष इतर बाबीसह विचारात घेणे आणि अभिलिखित करण्यासाठी गुरूवार, १२ ऑगस्ट, २०२१ रोजी घेण्यात येणार आहे.

सदर सूचना आणि वित्तीय निष्कर्ष कंपनीची वेबसाईट www.tatasteel.com तसेच नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडची वेबसाईट www.nseindia.com आणि बीएसई लिमिटेडची www.bseindia.com वर उपलब्ध करण्यात येतील.

टाटा स्टील लिमिटेड
सही/-
पार्वथीसम कांचीनाधम
कंपनी सेक्रेटरी आणि
चिफ लिगल ऑफिसर (कॉर्पोरेट आणि कॉम्पलायन्स)

४ ऑगस्ट, २०२१
मुंबई

TATA STEEL

परमबीर खंडणी आरोपप्रकरणी विशेष पोलीस पथक स्थापन

लोकसत्ता प्रतिनिधी

ठाणे : माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह व पोलीस अधिकाऱ्यांसह २८ जणांविरोधात ठाणेनगर पोलीस ठाण्यात सुमारे पाच कोटी रुपये खंडणी उकळल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे प्रकरण गंभीर असल्याने तपास अधिकाऱ्यांच्या मदतीसाठी ठाणे पोलिसांनी विशेष पथक स्थापन केले असून त्यात १० पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सामावेश असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

परमबीर सिंह हे ठाण्याचे पोलीस आयुक्त असताना २०१८ मध्ये त्यांनी केतन तन्ना आणि सोनू जालान यांना अटक केली होती. 'मोक्का' अंतर्गत होणारी कारवाई टाळण्यासाठी तसेच धमकावून सुमारे पाच कोटी रुपयांची खंडणी उकळल्याची तक्रार केतन तन्ना यांनी ठाणे पोलिसांकडे केली होती. या तक्रारीच्या आधारे परमबीर सिंह यांच्यासह २८ जणांविरोधात ठाणेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. विशेष पोलीस पथकात पाच सहाय्यक पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षकांचा सामावेश असून उर्वरित पोलीस कर्मचारी आहेत.

गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाण्यासाठी रेल्वेच्या १५० फेऱ्या

मुंबई : गणेशोत्सवाला कोकणात जाणाऱ्या प्रवाशांसाठी रेल्वे प्रशासन आता एकूण १५० फेऱ्या सोडणार आहे.

सर्वप्रथम ७२, त्यानंतर ४० फेऱ्यांची वाढ केल्यावर आता आणखी ३८ फेऱ्या वाढविण्यात येत आहेत, असे केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी गुरुवारी जाहीर केले. कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची अडचण होऊ देणार नाही. या पुढेही प्रतीक्षा यादी वाढली, तर आणखी फेऱ्यांची सोय करण्यात येईल. प्रवाशांना त्रास होऊ देणार नाही, असे दानवे यांनी सांगितले.

महानगर गॅस लिमिटेड
सीआयएन: एल४०२००एमएच१९९५पीएलसी०८८१३३
इक्विनॉक्स बिझनेस पार्क, ५वा मजला,
वेस्ट विंग, टॉवर क्र. ३, वान्द्रे-कुर्ला संकुल लगत, एलबीएस मार्ग,
कुर्ला – पश्चिम, मुंबई ४०००७०
MAHANAGAR GAS

रायगड जिल्ह्यात गोदामाची आवश्यकता
स्थान : पनवेल / शेडुंग / बोकरपाडा / रसायनी / चौक / खालापूर

[illegible]

www.mahanagargas.com

GP PARSIK SAHAKARI BANK LTD

(Multi-State Scheduled Bank)

मुख्य कार्यालय व वसुली विभाग : सहकारमुर्ती गोपीनाथ शिवराम पाटील भवन, जुना मुंबई पुणे रोड, पारसिक नगर, कळजा, ठाणे - 400605
फोन नं. 022-25456537 / 25456535, फॅक्स नं. 022-5456565

ई-लिलाव विक्री सुचना

वित्तीय परिसंपत्ती प्रतिभूतीकरण व पुनर्निर्माण व प्रतिभूति व्याज प्रवर्तन अधिनियम, 2002 अंतर्गत बँकेच्या प्रभाराधिन असलेली चल व अचल संपत्ती विक्री सुचना

खालील स्वाक्षरीकर्ता हा जीपी पारसीक सहकारी बँक लि. चा अधिकृत अधिकारी असून त्याने खालील मालमत्तेचा ताबा कायदा 13(4) सरफेसी ॲक्ट 2002 च्या अंतर्गत घेतला आहे. या सूचनेद्वारे जनतेला सूचित करण्यात येते की (सरफेसी ॲक्ट 2002 अंतर्गत) खालील वर्णित मालमत्तेचे ई-लिलाव विक्री बँकेच्या थकीत रकमेपोटी "जसे आहे जेथे आहे" व "जसे आहे जे आहे"या तत्वावर करण्यात येत आहे.

अ. क्र.	कर्जदार / जामिनदार / गहाणदार यांचे नाव आणि थकबाकी रक्कम ची तारिख 31 / 07 / 2021	अचल संपत्तीचे विवरण	राखिव किंमत (रु.) आणि बयाणा (ईएमडी) रक्कम	मागणी नोटीसची तारिख आणि रक्कम	ई-लिलावाची तारिख आणि वेळ
1	कर्जदार: सौ. कोळी प्रियांका अमित जामिनदार : 1) श्री. डोंगरे अजय विजय 2) श्री. दळवी नामदेव दत्ताराम 3) श्री. कोळी अमित सतिश शिल्लक रक्कम रु. 32,34,170/-	सिंपल गहाणखाताव्दारे तारण मालमत्ता सौ. प्रियांका अमित कोळी यांच्या मालकीची प्लॅट नं. 401, था मजला, साई कुंज इमारत एकूण बाल्कनी आणि प्रमाणित सामान्य क्षेत्रासह ओपन टेरेस एकूण एरिया 365 चौ.फुट सर्वे नं. 40, हिस्सा नं. 3(पार्ट) प्लॉट नं. 16, गाव कात्रप, ता. अंबरनाथ , कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दितील, जिल्हा ठाणे उपनोंदणी जिल्हा उल्हानगर, फर्निचर फिक्चर आणि फिटींग्स सह.	राखिव किंमत आणि ईएमडी रक्कम : रु. 28,53,000/- ईएमडी रु. 2,85,300/-	दि. 21/09/2019 रु. 26,48,095/- अधिक व्याज, शुल्क आणि खर्च	09/09/2021 रोजी 11.30 ते 01 वाजे पर्यत 05 मिनिटे अमर्यादीत विस्तारासह

*वरील शिल्लक कर्जाच्या रकमेवर पुढील व्याज, शुल्क व खर्च देय अथवा पुर्तता तारखेपर्यंत लागु राहील.

ई-लिलावाचा अटी व शर्ती खालीलप्रमाणे :

1) विक्री निर्धारित निविदा दस्तऐवज / ई-बोली-प्रक्रिया सूची मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन आहे. अचल मालमत्ता / सुरक्षित मालमत्तेचे पुढील तपशील आणि निविदा दस्तऐवज / ऑनलाइन लिलाव यादीमध्ये ई-लिलाव बिड फॉर्म समाविष्ट आहे, ऑनलाईन लिलाव विक्रीचे घोषणापत्र, सामान्य अटी व नियम संग्रहित / प्राप्त केले जाऊ शकतात, किंवा अधिकृत अधिका-याचे जीपी पारसीक सहकारी बँक लि., गोपीनाथ शिवराम पाटील भवन, पारसीक नगर, कळवा ठाणे-400605, येथे कोणत्याही कार्यकारी दिवसामध्ये प्राप्त होऊ शकतात तसेच ई-प्रोक्योरमेंट टेक्नॉलॉजीज लिमिटेड च्या **https://sarfaesi.auctiontiger.net**, किंवा जीपी पारसीक सहकारी बँक लिमिडेटचे www.gpparsikbank.com वरुन डाऊनलोड केले जाऊ शकते,

2) बॅकेचे अधिकृत सर्व्हिस प्रोव्हायडर मे. ई-प्रोक्युरमेंट टेक्नोलॉजिस लि. (ऑक्शन टायगर) अहमदाबाद संपर्क क्र. 07968136878, संपर्क व्यक्ती श्री चिंतन भट्ट, मोबाईल क्र. 9978591888, ई-मेल chintan.bhatt@auctiontiger.net वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net वर संपर्क करा.

3) जीपी पारसीक सहकरी बँक लि. चे प्राधिकृत अधिका-यांच्या सर्वोत्तम माहिती आणि समजुतीप्रमाणे मिळकतीवर कोणतेही भार नाहीत. तथापि, इच्छुक बोलीदारांनी त्यांच्या बोली सादर करण्यापुर्वी लिलावात ठेवलेल्या मिळकतीचे भार, हक्क आणि मिळकतीला बाधा आणणारे दावे / अधिकार / थकबाकीबाबत त्यांची स्वतंत्र चौकशी करावी. लिलाव जाहिरात म्हणजे बँकेचे कोणतेही अभिवचन किंवा अभिवेदन नाही आणि तसा समज करुन घेऊ नये. बँकेला ठाऊक असलेल्या किंवा नसलेल्या सर्व सध्याच्या आणि भावी भारांसह मिळकत विकली जात आहे. कोणत्याही त्रयस्थ पक्षकारांच्या दावे / अधिकार / थकबाकीसाठी प्राधिकृत अधिकारी / तारण धनको जबाबदार नसतील.

4) बयाणा रक्कम (ईएमडी) खाता क्र. 100007800000007, खाते नाव : अनामत अधिकृत अधिकारी (जीपीपीजेएसबी लि.). लाभार्थीचे नाव : जीपी पारसीक सहकारी बँक लि., आयएफएसी कोड क्र : PJSB0000002, या नावे आरटीजीएस / एनईएफटी फंड ट्रान्सफरद्वारे जमा करणे आवश्यक आहे. किंवा जीपी पारसीक सहकारी बँक लि. मुंबई च्या नावे राष्ट्रीयकृत / अनुसूचित बँकेवर काढलेले डिमांड ड्राफ्ट / पे ऑर्डर दि. 06 / 09 / 2021 रोजी 5 वाजेपर्यत निविदा भरण्यात याव्यात सदर निविदा किंवा ईएमडी सह न आलेल्या निविदानमूद केलेल्या वरील तारखेनंतर मिळालेल्या निविदा मान्य केल्या जाणार नाहीत आणि त्यानुसार नाकारले जाईल.

5. ईएमडी डिपॉझिट आणि केवायसी दस्तावेज (आधार कार्ड, मतदार ओळखपत्र / ड्रायव्हिंगचा परवाना / पासपोर्ट वगैरे) च्या यूटीआर पावत्यांप्रमाणेच बिड फॉमची हार्ड कॉपी. वर्तमान पत्ता-संप्रेषणाचा पुरावा, बोलीदाराचा पॅनकार्ड, वैध ई-मेल आयडी, संपर्क क्रमांक : बोलीदाराचा मोबाईल / लँडलाइन इत्यादी) वर नमूद केल्याप्रमाणे पुर्नप्राप्ती कार्यालयात जमा कराव्यात आणि प्रती पाठविल्या जाणा या प्रति स्कॅन कराव्यात अधिकृत अधिकारी द्वारा दि. 06 / 09 / 2021 रोजी किंवा त्यापूर्वी पोहोचण्यासाठी या ई-मेल आयडी वर hdgaikar045@gpparsikbank.net. संपर्क करावा. बोलीदारांना त्यांची बोली सादर करण्यापूर्वी आणि ई-लिलाव विक्री प्रक्रियेत भाग घेण्यापूर्वी लिलाव विक्रीच्या तपशील व अटींसाठी https://sarfaesi.auctiontiger.net या वेबसाइटवर जाण्याचा सल्ला दिला जातो. संभाव्य बोलीदाता विक्रीचा तपशील पाहू शकतो आणि ऑक्शन टायगर मोबाईल ॲप्लिकेशन (अँड्राईड) द्वारे बोली लावू शकतो.

6. इच्छुक बोलीदारांनी वैध डिजिटल सिग्रेचर प्रमाणपत्र आणि इ-मेल अँड्रेस धारण केलेला असला पाहिजे, सर्व आवश्यक माहिती आणि आयडी व पासवर्डची वाटप करणे आवश्यक आहे. डिजिटल सिग्रेचर संदर्भातील तपशिलाकरिता कृपया मे. इ-प्रोक्युरमेंट टेक्नोलॉजिस लि. (ऑक्शन टायगर) ई-मेल द्वारे सांगितले जाऊ शकते.

7. अचल मालमत्ता / सुरक्षित मालमत्तेचे कर्जदार / गहाणदार / जामिनदार त्यांची इच्छा असल्यास त्यांच्या संभाव्य वैध ऑफर (प्रायोजक) विक्रीची अटी व शर्ती योग्यरित्या पालन केल्यामुळे विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या स्थावर मालमत्ता / सुरक्षित मालमत्तेसाठी निविदा भरुन सहभागी होऊ शकतात.

8. पात्र बोलीधारकांची नावे, जीपी पारसीक सहकारी बँक लिमिटेडद्वारे ओळखले जातील. https://sarfaesi.auctiontiger.com. पोर्टलवर ऑनलाइन ई-लिलावात भाग घेण्याबाबत. ई-ऑक्शनमध्ये सहभागी होण्यासाठी पात्र बोलीदाराचे नाव मे. ई-प्रोक्युरमेंट टेक्नोलॉजिस लि. (ऑक्शन टायगर) अहमदाबाद संपर्क क्र. 07968136878, संपर्क व्यक्ती श्री चिंतन भट्ट, मोबाईल क्र. 9978591888, ई-मेल chintan.bhatt@auctiontiger.net पात्र निविदाधारकांच्या पॅनची पडताळणी झाल्यानंतर यूजर आयडी आणि पासवर्ड प्रदान करेल.

9. मालमत्ता कर / सेस आणि / किंवा बांधकाम व्यावसायिक / सोसायटीचे देय, दुरुस्ती निधी, हस्तांतरण शुल्क, इतर कर इत्यादींसारख्या वैधानिक देय निविदाकार / ऑफेरर्स / संभाव्य खरेदीदार हे भरती तसेच खरेदीवेळी लागणारे सर्व शुल्क खरेदीदार भरतील.. स्टॅम्प ड्यूटी, कायदेशिर शुल्क आणि नोंदणी शुल्क आणि विक्री प्रमाणपत्रांच्या बाबतीत लागू असलेल्या जीएसटीला केवळ खरेदीदाराकडूनच पैसे दिले जातील.

10. बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेविषयी स्वतःची पाहणी करण्यासाठी आणि संतुष्ट करण्यासाठी इच्छुकांची ही जबाबदारी असेल.

11. बोलीदाराची निविदा राखिव किंमती पेक्षा अधिक असेल बोलीदाता त्यांच्या पुढील ऑफर रु. 25,000/-. च्या पटीत बोली वाढवु शकतात. ई-लिलावाच्या समाप्तीच्या वेळेच्या शेवटच्या 5 मिनिटांमध्ये बिड लावला असल्यास, बंद होण्याचा वेळ आपोआप 5 मिनिटांसाठी वाढेल. ई-लिलाव प्रक्रियेस बंद होण्याकरिता सर्वात उच्च बोलीची रक्कम (रिझर्व्ह प्राईजपेक्षा कमी नाही) सादर करणा-या निविदाधारकाला यशस्वी बोलीदार म्हणून घोषित केले जाईल आणि त्या प्रभावाचा इलेक्ट्रॉनिक मोडद्वारे प्राधिकृत अधिका-याने / प्रतिभुत धकनो यांनी अधिकृतपणे मान्य केल्यावरजारी केला जाईल

12. यशस्वी बोलीदाराच्या बयाणा रक्कम (ईएमडी) भाग विक्री विचारात ठेवल्या जातील आणि अयशस्वी झालेल्या बिडर्सचे ईएमडी परत दिले जातील. बयाना रक्कम केणत्याही व्याजासह सहन करणार नाही. यशस्वी बोलीदारांना विक्रीची 25% रक्कम प्राधिकृत अधिका-यांनी बोली किमतस्वीकारल्यवर तात्काळ भरावी लागेल आणि उर्वरित विक्री किंमत विक्रीच्या 15 दिवसात किंवा प्राधिकृत अधिकारी त्यांच्या स्वतःच्या मर्जीने लेखी मान्यता देतील अशा वाढीव मुदतीम जमा करावी लागेल. यशस्वी बोलीदारांनी रक्कम जमा करण्यात कसुर केल्सयास आधी जमा केलेली रक्कम जप्त होईल आणि मिळकत पुनर्लिलावासाठी ठेवली जाईल व कसुरदार बोलीदारांन मिळकत / रकमेबाबत कोणताही अधिकार / दावा सांगता येणार नाही.

13. ई-लिलावाच्या तारखेपूर्वी ई- ऑक्शनवर मेसर्स ई-प्रोक्योरमेंट टेक्नॉलॉजीज लिलाव (ऑक्शन टायगर) वर संभाव्य पात्र बोलीधरक ऑनलाईन प्रशिक्षण घेऊ शकतात. कोणत्याही इंटरनेट नेटवर्कच्या समस्येसाठी / उर्जासलमधी / कोणत्याही अन्य तांत्रिक त्रुटी / अपयश इ. साठी अधिकृत अधिकारी / बँक आणि मेसर्स ई-प्रोक्योरमेंट टेक्नॉलॉजीज लिलाव (ऑक्शन टायगर) जबाबदार नाहीत. अशा संभाव्य परिस्थितीची प्रभाग बंद करण्यासाठी इच्छुकांना विनंती आहे की ते ई-ऑक्शन कार्यक्रमामध्ये यशस्वीरित्या सहभागी होण्याकरिता तांत्रिकदृष्टया योग्य पाठीचा बॅकअप घेऊन सज्ज आहेत.

14. अधिकृत अधिकारी / बँक कुठल्याही कारणासाठी कोणताही कारण न देता सर्वोच्च ऑफर स्वीकारण्यास बाध्य नाही आणि ई-ऑक्शन रद्द करणे किंवा लिलावाच्या प्रक्रियेतुन कोणत्याही मालमत्तेचा किंवा भाग काढून घेण्यासाठी किंवा कोणत्याही किंवा सर्व ऑफरर्स स्वीकार किंवा नाकारण्याचा किंवा स्थगित / रदद करण्याचा पूर्ण अधिकार आहे

15. विक्री प्रमाणपत्र फक्त खरेदीदार / अर्जदाराच्या नावाने दिले जाईल आणि इतर कोणत्याही नावाने दिले जाणार नाही.

16. विक्री सिक्युरिटायझेशन आणि आर्थिक पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज अधिनियम, 2002 अंतर्गत विहित केलेल्या नियम / अटींच्या अधीन असेल. अधिक माहितीसाठी / विक्रीच्या अटी व शर्तीवरील चौकशी, रिकव्हरी ऑफिसकडून दिलेल्या सपर्क क्रमांकावर मिळू शकेल.

17. तपासणीची तारीख 27 / 08 / 2021 रोजी सकाळी 11.00 ते सांय 4.00 वाजे पर्यत पूर्वीच्या भेटीसह

सरफैसी ॲक्ट अन्वये 30 दिवसांची वैधानिक विक्री सुचना

कर्जदार / जामिनदार यांना याद्वारे लिलिावाच्या तारखेपुर्वी आजतागायत व्याज आणि अनुषंगिक खर्चासह वरील रक्कत प्रदान करण्यास अधिसुचित केले जात आहे, कसुर केल्यास मिळकतिचा लिललाव / विक्री होईल आणि शिल्लक थकबाकी असल्यास व्याज आणि खर्चासह वसुल केले जातील.

सही / -
अधिकृत अधिकारी,
सरफैसी अधिनियम, 2002 या अंतर्गत
जीपी पारसीक सहकारी बँक लिमिटेड च्या वतीने

दिनांक : 06 / 08 / 2021
स्थळ : ठाणे
(शिक्का)

TATA STEEL LIMITED

TATA

Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001, India
Tel.: +91 22 6665 8282 Email: cosec@tatasteel.com
Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

सूचना

टाटा स्टील लिमिटेड (''कंपनी'') संचालक मंडळाची सभा ही ३० जून, २०२१ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता कंपनीचा लेखापरिक्षित अलिप्त आणि अलेखापरिक्षित एकत्रित वित्तीय निष्कर्ष इतर बाबीसह विचारात घेणे आणि अभिलिखित करण्यासाठी गुरूवार, १२ ऑगस्ट, २०२१ रोजी घेण्यात येणार आहे.

सदर सूचना आणि वित्तीय निष्कर्ष कंपनीची वेबसाईट www.tatasteel.com तसेच नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडची वेबसाईट www.nseindia.com आणि बीएसई लिमिटेडची www.bseindia.com वर उपलब्ध करण्यात येतील.

टाटा स्टील लिमिटेड
सही/-
पार्वथीसम कांचीनाधम
कंपनी सेक्रेटरी आणि
चिफ लिगल ऑफिसर (कॉर्पोरेट आणि कॉम्पलायन्स)

४ ऑगस्ट, २०२१
मुंबई

TATA STEEL

न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक लि.

(मल्टिस्टेट शेड्युल्ड बँक)

कॉर्पोरेट कार्यालय : न्यू इंडिया भवन, ए. व्ही. नागवेकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५

एनआय/सीओ/आरसी/०२८१४०११०००००७४/ २२६/ २०२१-२०२२ दिनांक : २२.०६.२०२१

सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या कलम १३(२) अन्वये सूचना

प्रति,

१. श्री. सज्जन तायाराम माळकर ....कर्जदार
फ्लॅट क्र. १०२, १ला मजला, ए-विंग, हरेश अपार्टमेंट, जय हरेश सीएचएस लि., नवघर, भाईंदर (पू.), तालुका वसई, जिल्हा पालघर-४०१ १०५.

२. सौ. संचिता सज्जन माळकर ....सह-कर्जदार
फ्लॅट क्र. १०२, १ला मजला, ए-विंग, हरेश अपार्टमेंट, जय हरेश सीएचएस लि., नवघर, भाईंदर (पू.), तालुका वसई, जिल्हा पालघर-४०१ १०५.

३. श्री. ज्ञानदेव तायाराम माळकर ....हमीदार
ए-३०२, ३रा मजला, ज्योती पार्क बिल्डिंग क्र. ४, इंद्रलोक, ९० फूट रोड, न्यु गोल्डन नेस्ट रोड, भाईंदर (पूर्व), ठाणे-४०१ १०५.

महोदय/महोदया,

संदर्भ : आमच्या पूनम गार्डन, मिरा रोड शाखेकडील तुमचे गृह कर्ज खाते क्र. ०२८१४०११०००००७४

१. मे. न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड (यानंतर बँक असा उल्लेख) जिची एक शाखा आहे पूनम गार्डन, मिरा रोड (पू.) येथे यांनी तुम्ही **क्र. १ आणि २** यांना येथील खालील नमूद मंजुरी पत्रामध्ये समाविष्ट अटी आणि शर्तीवर **रु. २३,००,०००/- (रुपये तेवीस लाख मात्र)** ची खालील गृह कर्ज सुविधा **(यानंतर 'सदर पतसुविधा' असा उल्लेख)** मंजुर केली आहे आणि तुम्ही **क्र. ३** यांनी हमीदार म्हणून व्याज, परिव्यय, प्रभार आणि खर्चासह सदर मुदत कर्जाच्या अंतर्गत देय आणि थकीत रकमेच्या परताव्याची हमी दिलेली आहे. मंजुरी पत्र आणि पत सुविधेचा तपशील खालीलप्रमाणे :-

मंजुरी पत्र क्र. आणि तारीख	सुविधेचा प्रकार	मंजूर रक्कम (रू. लाखात)	तारण
एनआय/क्रेडिट/३५३/२०१९-२० दिनांक १५.१०.२०१९	गृह कर्ज	२३.०० लाख	नवघर, भाईंदर (पू.), तालुका वसई, जि. पालघर येथे स्थित जय हरेश को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. अशा ज्ञात सोसायटीच्या हरेश अपार्टमेंट अशा ज्ञात बिल्डिंगमधील ए विंग मधील १ल्या मजल्यावरील फ्लॅट धारक क्र. १०२ वरील समभाग गहाण प्रभार. (मोजमापित ३६० चौ.फूट सुपर बिल्टअप क्षेत्र).

२. तुम्ही **क्र. १ आणि २** यांनी व्याज, परिव्यय, प्रभार आणि खर्चासह एकत्रित सदर पत सुविधेचे अंतर्गत देय आणि थकीत रकमेचा परतावा सुरक्षित करण्यासाठी बँकेच्या नावे खालील मिळकतीवर समतुल्य गहाण प्रभार निर्माण केले आहेत. तुम्ही मिळकतीचे मूळ नामाधिकार विलेख सुद्धा जमा केले आहेत आणि सदर मिळकतीवर प्रभार निर्माण करण्यासाठी आवश्यक दस्तावेज सुद्धा निष्पादित केले आहेत.

गहाण मिळकतीचा तपशील खालीलप्रमाणे :-

नवघर, भाईंदर (पू.), तालुका वसई, जि. पालघर येथे स्थित जय हरेश को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. अशा ज्ञात सोसायटीच्या हरेश अपार्टमेंट अशा ज्ञात बिल्डिंगमधील ए विंग मधील १ल्या मजल्यावरील फ्लॅट धारक क्र. १०२. (मोजमापित ३६० चौ.फूट सुपर बिल्टअप क्षेत्र).

३. तुम्ही **क्र. १ ते ३** यांनी वारंवार विनंती आणि स्मरणपत्रे पाठवूनही सदर सदर पत सुविधेच्या अंतर्गत देय आणि थकीत रकमेचा परतावा करण्यास कसूर केली आहे आणि त्यामुळे खाते **आयआरएसी नॉर्मसवरील रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्वानुसार ३१.०५.२०२१ पासून परिणामांसह नॉन परफॉर्मिंग ॲसेट** म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे.

४. पुढील व्याजासह एकत्रित वरील सदर गृह कर्जाच्या अंतर्गत तारखे रोजीस बँकेला देय आणि उर्वरित थकबाकी रक्कम खालीलप्रमाणे.

कर्ज खाते क्र.	उर्वरित थकबाकी रक्कम	पुढील व्याज
०२८१४०११०००००७४	रु. २४,०३,३५७.७६	मासिक आधारे चक्रवाढीने द.सा. ०१.०६.२०२१ पासूनचे ८.७५% आणि चक्रवाढी शिवाय द.सा. २% दराने दंड व्याज

५. तुम्ही क्र. **१ ते ३** यांना सदर तारखेपासून ६० दिवसांत येथील वरील नमूद दराने त्यावरील पुढील व्याजासह एकत्रित **रु. २४,०३,३५७.७६/- (रुपये चोवीस लाख तीन हजार तीनशे छप्पन आणि शहात्तर पैसे मात्र)** ची रक्कम अदा करण्यासाठी याद्वारे बोलविण्यात येत आहे, कसूर केल्यास बँक **''सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या** तरतुदीन्वये येथील वरील नमूद गहाण मिळकतीमधील बँकेच्या तारण हितसंबंधाच्या अंमलबजावणीकरिता पावले उचलेल याची कृपया नोंद घ्यावी.

६. सदर कर्जाच्या अंतर्गत बँकेला देय आणि थकीत रक्कम ही येथील वरील नमूद मिळकतीवरील गहाणाद्वारे सुरक्षित आहे. वरील सदर सूचना प्राप्त झाल्यापासून परिणामांसह तुम्हाला सदर गहाण मिळकत किंवा तिच्या कोणत्याही भागावर किंवा मध्ये कोणत्याही प्रकारचा व्यवहार, बोजा, विक्री, हस्तांतर, अभिहस्तांकन आणि/किंवा त्रयस्थ पक्षकाराचा हक्क निर्माण न करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

७. सदर सूचना ही कोणत्याही अन्य कायद्याच्या तरतुदीनुसार योग्य आणि आवश्यक मानल्यानुसार अशी अन्य करवाई आणि/किंवा कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यासाठी बँकेच्या हक्काला बाधा येऊ न देता आहे.

आपला स्नेहांकित
सही/-
प्राधिकृत अधिकारी

The spirit of Mumbai is now 93 years old!
THE FREE PRESS JOURNAL
www.freepressjournal.in

जाहीर सूचना

याद्वारे सर्व संबंधितांस कळविण्यात येते की, श्री. सुकूर बाबू पाटील, रा. भगत आळी, नारिंगी, विरार (पश्चिम), तालुका वसई, जिल्हा पालघर यांनी त्यांचे मालकीची कब्जेवहिवाटीची गांव मौजे चिखलडोंगरे, तालुका वसई, जिल्हा पालघर येथील मिळकत सर्व्हे नं./हिस्सा नं. २८५/१७ पैकी, क्षेत्र हे.आर. ०-१२-७०, पोटखराबा क्षेत्र हे.आर. ०-००-५०, आकारणी रु. ०.४८ पैसे ही मिळकत माझे अशिलांस विकण्याच्या वाटाघाटी करीत आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाही इसमांचा, व्यक्तीचा गहाण, दान, दावा, वारसा, वहिवाट, विश्वस्त, बोजा, विक्री, कुळारग, अदलाबदल वा अन्य हक्क, हितसंबंध असेल तर तो त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या ए/१०१, ''आरती अपार्टमेंट'', वर्तक रोड, विरार (पश्चिम), तालुका वसई, जिल्हा पालघर या पत्त्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह कळवावा. अन्यथा तसा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुरा केला जाईल.

(श्री. एन. बी. देशमुख)
खरेदीदारांचे वकील

युटीक इंटरप्राईझेस लिमिटेड

(पूर्वी ॲपल फायनान्स लिमिटेड)

नोंदणी. कार्या.: ८ अपीजय हाऊस, १३० मुंबई समाचार मार्ग, मुंबई - ४०० ०२३.
(सीआयएन: एल५२१००एमएच१९८५पीएलसी०३७७६७)
दूर. क्र. : ९१+२२-२२८८ ६१००
info@utique.in / www.utique.in

सूचना

सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन २९(१)(ए) सहवाचता विनियमन ४७ अनुसार याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, दि. ३० जून, २०२१ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता कंपनीच्या अलिप्त आणि एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष अहवालांवर विचारविनीमय आणि मान्यता देण्याकरिता इतर बाबींसह युटीक इंटरप्राईझेस लिमिटेडच्या संचालक मंडळाची सभा शुक्रवार, ऑगस्ट १३, २०२१ रोजी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयामध्ये आयोजित करण्यात येत आहे.

सदर सूचनेची माहिती कंपनीची वेबसाईट www.utique.in वर व बीएसई लिमिटेडची वेबसाईट www.bseindia.com वर उपलब्ध आहे.

युटीक इंटरप्राईझेस लिमिटेडकरिता
पी.बी.देशपांडे
कंपनी सचिव

दिनांक : ०६.०८.२०२१
ठिकाण : मुंबई

NOTICE

PLEASE TAKE NOTICE that my clients want to purchase Flat No. 4 on ground floor in the Building known as 'Ish-Kripa' lying being and situate on a plot of land bearing plot No. 617, T.P.S. No. III bearing CTS No. F/97 of village - Bandra, Taluka - Andheri, in the Registration District of Mumbai Suburban situated at Ish-Kripa' Co-operative Housing Society Ltd., 14th Road, Khar (West), Mumbai 400052 which was acquired under agreement dated 17th December, 1959 Measuring 585 Sq.Ft. Carpet area and one additional adjoining room from Flat No.3 acquired under agreement dated 12th September, 1973 Measuring 135 sq.ft. carpet area aggregating to total area 720 sq.ft. carpet area together with closed garage No.1 located at North West Corner of the society compound measuring 180 sq.ft carpet area together with 5 (Five) Fully paid-up shares bearing Distinctive Share Nos. 16 to 20 (both inclusive) under Share Certificate No. 4 and 5 (Five) fully paid-up Shares bearing Distinctive Share Nos. 51 to 55 (both inclusive) under Share Certificate No. 11 in respect of closed garage No.1 including all the benefits of deposits, sinking funds deposits and all other deposits lying to the credit of the Transferors in 'Ish-Kripa' Co-operative Housing Society Ltd. If anyone has have any claim, right, title, interest of what so ever nature in respect of above Flat No. 4 together with additional area of Flat No. 3 and garage No.1 and its Shares, he/she/they/ it or any one who so ever may be shall inform the under signed with supporting documents. If no claim is received by the under signed within the period of 15 days from the publication hereto, it shall be presumed that save and except Transferors, no one has have any right, title, interest and or claim of what so ever nature in respect of above premises and my clients shall proceed to purchase the above property presuming that no one has have any right, title, interest and or claim of what so ever nature in respect of above premises, If any claim is received after expiring of 15 days from the publication of this notice, the same shall not be considered.

R. R. Sharma
Advocate
Office Nos. 2 & 3, ground Floor, Junction of Hill Road & Jain Temple Road, Bandra (West), Mumbai - 400050.
Mobile No. 9820136129
Phone :- 022 26409493

FEDERAL BANK

YOUR PERFECT BANKING PARTNER

लोन कलेक्शन अँण्ड रिकव्हरी डिपार्टमेंट / मुंबई विभाग
दि फेडरल बँक लि., एलसीआरडी/मुंबई विभाग,
१३४, जॉली मेकर चेंबर्स क्र. २, १३ मजला, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
फोन: ०२२ २२८५३७१२/२२०२८४२७,
ईमेल : bbyo@federalbank.co.in, Website : www.federalbank.co.in
स्पिड पोस्ट सह एडी

१) श्री. मुकेश पिल्लई, वय ४४ वर्षे, श्री. सदाशिवन पिल्लई यांचा मुलगा, रहिवासीत येथे, आरएच १०, इन्सिग्निया ब्रुक जमीन, उंद्री, पिसोली रोड, पुणे-४११०६०, महाराष्ट्र.
तसेच येथे,
प्लॉट क्र. ७९, क्लोव्हर हिल्स सीएचएस लि., एनआयबीएम उंद्री रोड, कोंधवा खुर्द, तालूका हवेली, जिल्हा पुणे, महाराष्ट्र- ४११०४८
एकमेव प्रोप्रायटरशीप संस्था श्री. मुकेश पिल्लई
व्यवसाय या नावे सुरु बॉम्बे ग्लेझ,
जिचे व्यवसाय ठिकाण येथे
गाळा क्र. ५६६, अनु क्र. ३७, हिस्सा क्र. १, ४ ३ २, पिसोली इंडस्ट्रीअल झोन, पुणे- ४११ ०६०, महाराष्ट्र
२) सौ. नंदिनी के माळी, वय ३९ वर्षे, श्री. मुकेश पिल्लई यांची पत्नी, रहिवासीत येथे आरएच १०, इन्सिग्निया ब्रुक लॅण्ड, उंद्री, पिसोली रोड, पुणे- ४११०६०, महाराष्ट्र
तसेच येथे,
प्लॉट क्र. ७९, क्लोवर हिल्स सीएचएस लि., एमआयबीएम उंद्री रोड, कोंधवा खुर्द, तालूका हवेली, जिल्हा पुणे, महाराष्ट्र- ४११०४८.

प्रती,

सिक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (यानंतर ॲक्ट असा उल्लेख) च्या कलम १३(२) अन्वये जारी सूचना.

तुम्हाला बँकेच्या नावे आवश्यक तारण करार/कर्ज दस्तावेज निष्पादित करून गृह कर्जासाठी तिच्या मुंबई/क्रॉफर्ड मार्केट शाखेमार्फत दि फेडरल बँक लिमिटेड, कंपनी अधिनियम अन्वये नोंदणीकृत कंपनी, जिचे नोंदणीकृत कार्यालय आहे आलवेय येथे (यानंतर बँक असा उल्लेख) कडून पतसुविधा दिले होते.

अनु क्र.	कर्ज प्रकार	मंजूर मर्यादा रुपये मध्ये	देयाची तारिख	थकबाकीत रक्कम रुपये मध्ये	यांना उपलब्ध
१	ओडी आणि कॅश क्रेडीट कर्ज खाते क्र. १२८५५५०००००२५७४	१,६०,००,०००/-	२५/०७/२०१९	रु. १,६९,५९,२६१.७१/- सह ०१/०६/२०२१ पासून १०.९५% दराने पुढील व्याज आणि त्यावरील परिव्यय	तुम्ही क्र. १ मुख्य कर्जदार म्हणून आणि क्र. २ सह-अर्जदार/कर्जदार म्हणून
२	जीईसीएएल: टर्म लोन कर्ज खाते क्र. १२८५६९००००००९११	३९,४८,०००/-	२३/०७/२०२०	रु. ४१,६३,३६६.४९/- सह २३/०६/२०२१ पासून ११.२५% दराने पुढील व्याज आणि त्यावरील परिव्यय	तुम्ही क्र. १ मुख्य कर्जदार म्हणून आणि क्र. २ सह-अर्जदार/कर्जदार म्हणून
३	गृह कर्ज कर्ज खाते क्र. १२८५७३०००००९६४	४,५०,००,०००/-	११/१०/२०१७	रु.४,५६,२८,०३४.२७/- सह ११/०६/२०२१ पासून १०.००% दराने पुढील व्याज आणि त्यावरील परिव्यय	तुम्ही क्र. १ मुख्य कर्जदार म्हणून आणि क्र. २ सह-अर्जदार/कर्जदार म्हणून

बँकेकडून दिलेल्या वरील पतसुविधेच्या तारणांच्या बाबतीत तुम्ही क्र. १ यांनी पुढील स्थावर मिळकतच्या संदर्भात गहाणाच्या मार्गे द्वारे बँकेच्या नावे तारण हितसंबंध निर्माण केले आहे.

जंगमगहाण जंगम मिळकतींचे वर्णन
बुक डेप्थचे जंगमगहाण सह ५०% मार्जिन

स्टॉकचे जंगमगहाण सह २५% मार्जिन

बँकेकडून दिलेल्या वरील पतसुविधेच्या तारणांच्या बाबतीत तुम्ही क्र. १ आणि २ रा यांनी पुढील स्थावर मिळकतच्या संदर्भात गहाणाच्या मार्गे द्वारे बँकेच्या नावे तारण हितसंबंध निर्माण केले आहे. :

वरील १ आणि २ पतसुविधीकरीता गहाण स्थावर मिळकतीकचे वर्णन

गाव उंद्रीचा जमीन धारक सर्व्हे क्र. ४६/१/१ए आणि ४६/१/१बी मध्ये स्थित इन्सिग्निया ब्रूकलॅण्ड नावे ज्ञात अपार्टमेंट, रो हाऊस क्र. आरएच-१०, तळ + पहिला मजला, मोजमापित १८११.२५ चौ.फू. म्हणजेच १६८.२७ बिल्ट अप क्षेत्र आणि युनिट आय लेव्हल टेरेस मोजमापित १७६.७५ चौ.फू. (१६.३७ चौ.मीटर्स) चार्जेबल क्षेत्र आणि युनिट टॉप टेरेस क्षेत्र मोजमापित १७३.७५ चौ.फू. (१६.१४ चौ.मीटर्स) चार्जेबल क्षेत्र आणि युनिट गार्डन टेरेस मोजमापित ३७१ चौ.फू. (३४.४६ चौ.मीटर्स) चार्जेबल क्षेत्र सह युनिट पार्किंग क्षेत्र ८७.५० चौ.फू. (८.१३ चौ.मीटर्स) चार्जेबल क्षेत्रचे सर्व ते भाग आणि विभाग. सीमाबद्धः पूर्वेला: उंद्री सीमा, दक्षिणेला: सर्व्हे क्र. ४६/१ चा उर्वरीत भाग, पश्चिमेला: सर्व्हे क्र. ४५, उत्तरेला: गाव पिसोलीचा सर्व्हे क्र. ४५ आणि सर्व्हे क्र. ५९/आयए, पूर्वेला: उंद्री पिसोली रोड, दक्षिणेला: सर्व्हे क्र. ५९/१ए चा उर्वरीत भाग, पश्चिमेला: पिसोली सीमा, उत्तरेला: सर्व्हे क्र. ६, युरो स्कूल बाजूला मिराचंदानी बेलाजिओ सोसायटी जवळ, उंद्री, पिसोली, तालूका-हवेली, जिल्हा पुणे, पिनकोड- ४११०६०, महाराष्ट्र राज्य सह बांधण्यात येणाऱ्या आणि सध्याच्या आणि किंवाअसलेल्या इमारती सीमाबद्धः पूर्वेला: रो हाऊस क्र. ११, दक्षिणेला: प्लॉट क्र. ८१, पश्चिमेला: प्लॉट क्र. ११२ आणि प्लॉट क्र. ११० चा भाग आणि उत्तरेला: प्लॉट क्र. ७७.

वरील ३ पतसुविधीकरीता गहाण स्थावर मिळकतीकचे वर्णन

एनआयबीएम उंद्री रोड, खोंडवा खुरुद गाव, हवेली तालूका, पुणे जिल्हा, महाराष्ट्र येथे स्थित प्लॉट क्र. ७९, धारकसर्व्हे क्र. २७, हिस्सा क्र. २,३,४,६ए/१, ६ए/२, ६बी, ७, ८/१, ८ बी/२ मध्ये क्लोव्हर हिल्स नावे ज्ञात प्रोजेक्टमध्ये क्लोव्हर हिल्स को-आप. हाऊसिंग सोसायटी लि. मध्ये रहिवासीत बंगला, मोजमापित ६१०१ चौ.फू. म्हणजेच ५६७ चौ.मीटर्स सह बंगला बांधकामीत मोजमापित ४१४० चौ.फू. म्हणजेच ३८४.७५ चौ.मीटर्स बिल्ट अप क्षेत्रचे सर्व ते भाग आणि विभाग आणि सीमाबद्धः पूर्वला: आतील रस्ता, दक्षिणेला: प्लॉट क्र. ८१, पश्चिमेला: प्लॉट क्र. ११२ चा भाग आणि प्लॉट क्र. ११० चा भाग आणि उत्तरेला: प्लॉट क्र.७७.

वरील सदर जंगमगहाण/गहाण तारण मिळकतींचा यानंतर 'तारण मत्ता' असा उल्लेख. तुम्ही मान्य केलेल्या अटींचे उल्लंघन करून वरील तारण कर्जाचा परतावा करण्यास कसूर केलेली आहे आणि ओडी आणि कॅश क्रेडीट कर्ज खाते क्र. १२८५५५०००००२५७४ आणि जीईसीएएल: टर्म लोन कर्ज खाते क्र. १२८५६९००००००९११ खाते यांची ३०/०३/२०२१ रोजी आणि गृह कर्ज कर्ज खाते क्र. १२८५७३०००००९६४ याची ३१.०३.२०२१ रोजीस आरबीआयच्या मार्गदर्शक तत्वांनुसार नॉन परफॉर्मिंग ॲसेट बनले आहे.

निम्नस्वाक्षरीकार फेडरल बँक लि.चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने तुम्हाला सूचित करीत आहेत की, रक्कम रु. ६,६७,५०,६६२.४७/- (रुपये सहा करोड सदुसष्ट लाख पन्नास हजार सहाशे बासष्ट आणि पैसे सत्तेचाळीस मात्र) यासह वार्षिक दराने व्याज व अधिक पासूनचे मासिक इतर अधिक प्रभार ही रक्कम बँकेच्या **विरार** शाखेकडील तुमच्या कर्ज खात्याअंतर्गत संयुक्तपणे आणि वेगवेगळी थकीत आहे.

बँक तारण धनको या नात्याने सदर ॲक्टच्या कलम २ (झेडडी) अंतर्गत उद्देश ठेऊन तुम्हाला सदर ॲक्टच्या कलम १३ (२) अंतर्गत **सदर सूचना तारखेपासून ६० दिवसांत** प्रदानाच्या तारखेपर्यंत सदर रक्कम, प्रभार/इतर खर्च व त्यासह पुढील व्याज इ. ची थकबाकी रक्कम प्रदान करण्यासाठी याद्वारे बोलावणे करीत आहे. कसूर केल्यास बँक तारण धनको या नात्याने कोणत्याही इतर हक्क आणि उपायांचा पूर्वग्रह न ठेवता, पुढील कोणतीही सूचना न देता सदर ॲक्टच्या कलम १३(४) अंतर्गत विहित खालील उपायांचा अवलंब करेल:

१. वरील वर्णिलेल्या तारणमत्तांचा कब्जा घेणे आणि थकबाकी वसूल करण्यासाठी सदर मत्ता भाडेपट्टा, अभिहस्तांकन किंवा विक्रीच्या मार्गाने हस्तांतरण करणे.

२. तारण मत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे आणि थकबाकी वसूल करण्यासाठी भाडेपट्टा, अभिहस्तांकन किंवा विक्रीच्या मार्गाने तिचे हस्तांतरण करणे.

३. बँकेद्वारे ताब्यात घेतलेल्या तारण मत्तेच्या व्यवस्थापनासाठी कोणाही व्यक्तीची नियुक्ती करणे.

४. बँकेस भरणा करण्यास अशी व्यक्ती ज्यांनी तारण मत्ता संपादित केली आहे वा अशी व्यक्ती जिला तुम्ही थकबाकी देणे आहे वा अशी व्यक्ती जिच्याकडून तुम्हाला थकबाकी येणे आहे त्यासंबंधी बँकेस लेखी स्वरुपात सूचित करणे आवश्यक आहे.

सदर ॲक्टच्या कलम १३(१३) अंतर्गत तुम्हाला याद्वारे सूचना देण्यात येते की, सदर सूचना प्राप्त झाल्यानंतर तुम्ही सदर सूचनेत नमूद करण्यात आलेली तारण मत्ता बँकेच्या पूर्वनियोजित लेखी संमतीशिवाय बँकेच्या हितसंबंधाला बाधा येऊ न देता कोणत्याही बाबतीत सदर सूचनेत उल्लेखित तारण मत्ता विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य स्वरुपात हस्तांतरण करू शकत नाही.

तुम्हाला याद्वारे सदर ॲक्टच्या कलम १३(६) अंतर्गत सूचना देण्यात येते की, जर, सदर तारण मत्तेच्या मालकांकडून हस्तांतरण झाल्यास बँकेकडे तारण मत्तेच्या संदर्भात हस्तांतरण करण्याचे हस्तांतरिती या नात्याने सर्व अधिकारांवर वैध नामाधिकार देणे आवश्यक आहे. सदर सूचना प्राप्तीच्या ६० दिवसांत तुम्ही बँकेच्या तुमच्यावरील सर्व देयाची परतफेड करण्यास कसूरवार ठरल्यास सूचना घ्यावी आणि बँक सदर ॲक्ट अंतर्गत उपायांची कार्यवाही करतील. तुम्ही पुढे त्यासंबंधी बँकेस सर्व रक्कम, आकार आणि करण्यात आलेल्या खर्चाचा भरणा करण्यास जबाबदार असाल. तुमचे लक्ष तारण मत्ता (तारण मिळकती) विमोचित करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात अधिनियमाच्या कलम १३ (८) च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे. तारण मत्तेच्या विक्री प्रक्रियेतून थकितांची वसुली न झाल्यास बँक तुमच्याकडून व्यक्तिगत थकीत रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करेल. त्यांच्या थकबाकीच्या वसुलीकरिता सदर सूचना बँकेकडे उपलब्ध असलेल्या हक्कांचा आणि उपायांचा पूर्वग्रह न ठेवता निर्गमित करण्यात येत आहे.

सदर दिनांक, २३ जून, २०२१

दि फेडरल बँक लि. करिता
लेसिन सी
सहा. उपाध्यक्ष आणि विभागिय प्रमुख
लोन कलेक्शन अँण्ड रिकव्हरी डिपार्टमेंट - मुंबई विभाग
(सरफैसी ॲक्ट अन्वये प्राधिकृत अधिकारी)

मुंबई येथील मुंबई नगर दिवाणी न्यायालयात
दिंडोशी, मुंबई येथील बोरिवली विभाग
वाणिज्यिक वाद क्र. ५८३ सन २०२०

आयसीआयसीआय बँक लि.
कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये स्थापित आणि नोंदणीकृत आणि बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ अन्वये परवानाधारक निगम निकाय, जिचे नोंदणीकृत कार्यालय आहे आयसीआयसीआय बँक टॉवर, चकली सर्कल, बडोदा ३९०००७, गुजरात आणि तिचे कॉर्पोरेट कार्यालय आहे आयसीआयसीआय बँक टॉवर्स, ४ था मजला, साऊथ टॉवर, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू.), मुंबई-४०० ०५१ आणि शाखा आहे ट्रान्स ट्रेड सेंटर, ५ वा मजला, फ्लोअर डेक प्लाझा जवळ, अंधेरी (पू.), मुंबई- ४०००९३. द्वारा तिचे प्राधिकृत अधिकारी
सौ. शिल्पा वसंत निकम
कर्ज व्यवस्थापक, वय ३७ वर्ष
पेशा: नोकरी ... वादी

विरुध्द

महेश बसवराज शेवती
वय ३२ वर्ष, पेशा: नोकरी, खोली क्र. २४२, प्लॉट क्र. ३८, एसपी नगर, वॉटर टँक जवळ, एमएचबी कॉलनी, अंबरनाथ, ठाणे-४२१५०१.
आणि येथे सुध्दा
१३०, १-मजला, प्लॉट क्र. १९ए, सेक्टर २५, सी वूड्स कॉर्नर, नेरुळ, नवी मुंबई- ४००७०६.
... प्रतिवादी

सूचना घ्यावी की, सदर सन्माननीय न्यायालय खालील अनुतोषांकरिता वरील नावाच्या प्रतिवादींद्वारे १२.०८.२०२१ रोजी स. ११ वा. मध्यान्ह वेळी न्यायालय खोली क्र. ५ मधील पीठासिन सन्माननीय अति. सत्र न्यायाधिश **श्री. के.व्ही. मोरे** यांच्यासमोर प्रचलित होणार आहे.

(ए) सन्माननीय न्यायालयाने कृपा करुन **रु. ६,५२,९४७.७०/- (रुपये सहा लाख बावन्न हजार नऊशे सत्येचाळीस आणि पैसे सत्तर मात्र)** ची रक्कम परत करण्यासाठी सदर सन्माननीय न्यायालयाच्या कार्यालयाला निर्देश द्यावेत.
(बी) वरील विनंती नुसार अधि-अंतरिम अनुतोष.
(सी) खटल्याचा प्रकार आणि परिस्थितीनुसार अशा अन्य आणि पुढील अनुतोषांकरिता.

दिनांक २८ जुलै, २०२१

प्रबंधकांकरिता
नगर दिवाणी न्यायालय
मुंबई

सीलर

मे. भिडे अँण्ड असोसिएटस्
वादींकरिता वकील
डी९४, १५ वा रस्ता, प्लॉट क्र. १८७,
चेंबूर, मुंबई-४०००७१.

महाराष्ट्र शासन

GRANT GOVERNMENT MEDICAL COLLEGE &
SIR J. J. GROUP OF HOSPITALS, MUMBAI
(GOVERNMENT OF MAHARASHTRA)
ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज. जी. समूह रुग्णालये, मुंबई-८
Tel. No. 373 55 55, 373 1144; Fax No. 373 55 99; e-mail - gmcjjh@bom7.vsnl.net.in

क्र. ग्रॅशावैम/निविदा सूचना/ग्रॅशावैम जिमखाना/खा.भा.त./२०२१-२२/४७७५/२१, दि. ०५.०८.२०२१

Grant Government Medical College, Mumbai had invited a Tender for the purpose of avoiding financial burden on the Government and generate revenue to conduct Student's Physical Education, Sports and cultural activities. For that Tender Notice was published in Renown New paper. Hence for a competitive response, we have extending the tender period from 06/08/2021 to 17/08/2021 along with the below mentioned amendment.

1) Bidders shall pay the E.M.D. in the form of DD/Fix Deposit in favor of Dean, Grant Government Medical College, Mumbai payable at Mumbai.
2) Bidders who have already submitted tender will be considered.
3) Tender is invited for utilizing Appro. 1269.34 Square Yard area at Grant Medical College Gymkhana, Mumbai.
4) Other Terms and Conditions are as per Tender document.

निविदा सूचना

ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील जी.एम.सी. जिमखाना खाजगी भागीदारी तत्त्वावर उपलब्ध करून देण्याकरिता निविदेच्या माध्यमातून खाजगी भागीदारी नियुक्त करण्याकरिता दिनांक १७/०६/२०२१ रोजीच्या आदेशान्वये निविदेस योग्य प्रकारे प्रतिसाद न प्राप्त झाल्याने सदर निविदेस मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर मुदतवाढीप्रमाणे पुनःश्च कार्यवाही खालील तपशिलाप्रमाणे करण्यात येईल. तसेच ज्या निविदाकारांनी यापूर्वी निविदा सादर केल्या आहेत. त्यांनी परत निविदा सादर करण्याची गरज नाही.

१	कोऱ्या निविदा फॉर्मची विक्री करणे	दि. ०६/०८/२०२१ ते दि. १७/०८/२०२१ संध्याकाळी ५.०० पर्यंत
२	निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ	दि. १८/०८/२०२१ संध्याकाळी ५.०० पर्यंत
३	तांत्रिक लिफाफा (क्र.१) उघडण्याचा दिनांक	दि. २०/०८/२९२१ संध्याकाळी ४.०० वाजता
४	व्यापारी लिफाफा (क्र.२) उघडण्याचा दिनांक	दि. २३/०८/२०२१ संध्याकाळी ३.०० वाजता
५	निविदा पूर्व बैठक	दि. २०/०८/२०२१ संध्याकाळी ३.०० वाजता

निविदेची माहिती

कामाचे वर्णन	निविदा अर्जाचे शुल्क	अनामत रक्कम	निविदेचा दिनांक	निविदा सादर करण्याचा दिनांक	करार कालावधी
ग्रॅण्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील जी.एम.सी. जिमखाना खाजगी भागीदारी तत्वावर उपलब्ध करून देण्याकरिता निविदेच्या माध्यमातून खाजगी भागीदारी नियुक्त करणे.	१०,०००/-	५०,००,०००/-	दि. ०६/०८/२०२१	दि. १८/०८/२०२१	दहा वर्ष

संपर्क क्रमांक - ०२२-२३७३५५५५
Email - deangmcjjh@gmail.com

सही/-
अधिष्ठाता
ग्रॅण्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई